अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org

अपील क्र.६७/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/ ५३८६

दि. २९/०८/2023

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका**

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/६७/२०२३

प्रती,

श्री.अनिल ठकाजी खाडे,

शिर्डी कलिकानगर,

अहमदनगर - ४२३१०९

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.अनिल ठकाजी खाडे, शिर्डी कलिकानगर, अहमदनगर – ४२३१०९ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा PUMCO/R/2023/60969 दि.३०/६/२०२३ (आ.क्र.५८४०, दि.५/७/२०२३) रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४६६९, दि.२७/७/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ३०/६/२०२३ | ५/७/२०२३ | ४/८/२०२३ | २७/७/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार मी कोणतीही माहिती मागू शकतो असे PUMCO/A/2023/60160 दि.२/८/२०२३ रोजी अर्ज (आ.क्र.७८२४ दि.३/८/२०२३) सादर केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २/८/२०२३ | ३/८/२०२३ | २६/८/२०२३ | आहे | -- |

अपिलार्थी यांची दि.१७/०८/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. अपिल सुनावणी आयोजित करण्यात आली असल्याबाबत कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी वैद्यकिय कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याबाबत दि.११/८/२०२३ रोजी ईमेलद्वारे कळविले आहे. सबब, अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "सेवाभरती २०२३ पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग ३ पशुधन पर्यवेक्षक दि.२२/६/२०२३ रोजी झालेल्या परिक्षेची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका प्रत मिळावी ही आपणास नम्र विनंती. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार मी कोणतीही माहिती मागू शकतो. माहिती देण्यात पात्र अपात्र असे काही नसते. मला वरीलप्रमाणे माहिती द्यावी" असे लेखी म्हणणे प्रथम अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी अर्जास दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे दिले आहे.

| मुद्दा.क्र. | माहिती | उत्तर |
|---|---|---|
| १) | सेवाभरती २०२३ पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग ३ पशुधन पर्यवेक्षक दि.२२/६/२०२३ रोजी झालेल्या परिक्षेची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका प्रत मिळावी ही आपणास नम्र विनंती | सदर विषयी मे.IBPS संस्थेस कळविले असून संबंधित माहिती मिळताच आपणास आपल्या ईमेल वर पाठविण्यात येईल . |

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत IBPS यांचेकडून दि.३१/७/२०२३ रोजी माहिती प्राप्त झाली असून श्री.अनिल खाडे यांना दि.२/८/२०२३ रोजी ईमेलद्वारे पाठविण्यात आले असल्याबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. तसेच, पदभरती जाहिरातीच्या मुद्दा क्र.१५.२ मध्ये हे स्पष्ट नमूद केले आहे. सदर अभिलेखे हे संबंधित संस्थेचे असून महापालिकेच्या अभिलेखाचा भाग नाहीत. तथापि, अपिलार्थी ऑनलाईन परिक्षेसाठी हजर नसलेचे संबंधित संस्थेने कळविले आहे. तसेच कंपनीचे धोरणानुसार प्रश्नपत्रिका देता येणार नसलेचेही नमूद केले आहे. त्यानुसार संबंधित उत्तर अपिलार्थी यांना ईमेलद्वारे देणेत आले आहे. सबब, त्यानुसार पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

# आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दि.२/८/२०२३ रोजी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली माहिती योग्य आहे. त्यानुसार, सदर अपिल क्र.६७/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

21/8/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.